मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अखेर पुनावळेतील कचरा डेपोचे आरक्षण रद्द

## नागरिकांच्या विरोधाला यश : कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याचे आरक्षण नवीन विकास आराखड्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि वाढत्या नागरीकरणामुळे कचऱ्याची समस्या गंभीर होत असल्याने महापालिकेने पुनावळे येथील वन विभागाच्या जागेवर सन २००८ मध्ये टाकलेले कचरा डेपोचे आरक्षण स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधींच्या तीव्र विरोधामुळे रद्द केले आहे. या जागी व्यावसायिक गाळे, कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याचे आरक्षण नवीन विकास आराखड्यात टाकण्यात आले आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात एका दिवसाला १२३० टन कचरा निर्माण होतो. घंटागाडीच्या माध्यमातून संकलित करून हा कचरा मोशीतील डेपोत टाकला जातो. सन १९९१ पासून येथील परिसरात असलेल्या डेपोत कचरा टाकला जात आहे. लोकसंख्या वाढल्याने कचऱ्याचे संकलनही वाढले. त्यामुळे मोशीत कचरा साचून डोंगर तयार झाले. भविष्याची गरज ओळखून महापालिकेने पुनावळे येथे २००८ मध्ये २२.८ हेक्टर जागेवर कचरा डेपोचे आरक्षण टाकले होते. हिंजवडी, पुनावळे, मारुंजी, ताथवडे या गावांच्या मध्यभागी ही वन विभागाची जागा आहे. आरक्षण टाकताना पुनावळे भागात नागरीकरण झाले नव्हते. परंतु, मागील १७ वर्षात या परिसरात गगनचुंबी इमारती उभारल्या. प्रचंड नागरीकरण झाले.

नैसर्गिक वातावरण, बाजूला असलेली माहिती व तंत्रज्ञाननगरी, शैक्षणिक सुविधांमुळे या भागात राहण्यासाठी पसंती वाढली. परिणामी, एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या झाली. मागील वर्षी महापालिकेने पुनावळेत कचरा डेपो उभारण्यासाठी हालचाली करताच नागरिकांनी तीव्र विरोध सुरू केला. घंटानाद, दुचाकी फेरी, साखळी उपोषण, डेपोच्या जागेवरील झाडांना चिपको आंदोलन केले. तत्कालीन आमदार अश्विनी जगताप यांनीही विधिमंडळात या विरोधात आवाज उठविला. कचरा डेपोला वाढता विरोध पाहून सरकारने अधिवेशनात डेपोला स्थगिती दिली. आता नव्याने करण्यात आलेल्या शहर विकास आराखड्यात डेपोचे आरक्षणच रद्द करण्यात आले आहे.

पुनावळे कचरा डेपोला स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधींचा विरोध होता. राज्य शासनानेही स्थगिती देण्याबाबत सांगितले होते. जनतेच्या भावनांचा विचार करून आरक्षण रद्द केले आहे. मोशी कचरा डेपोत बायोमायनिंग प्रकल्पाचे काम झाले आहे. कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जात आहे. त्यामुळे येथे जागा उपलब्ध होणार आहे, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. तर, पुनावळेतील कचरा डेपोच्या आरक्षणाच्या जागेवर व्यावसायिक गाळे, कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याचे आरक्षण टाकण्यात आले आहे. यासाठी वन विभागाकडून जागा ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड यांनी सांगितले.

### वनीकरणासाठी तीन कोटी

» कचरा डेपोसाठी झाडे तोडावी लागणार होती. त्यामुळे महापालिकेने वनीकरणासाठी तीन कोटी ५७ लाख रुपये वन विभागाला दिले आहेत. या जागेच्या बदल्यात चंद्रपूर जिल्ह्यातील वन विभागाच्या शेजारील २३ हेक्टर जमीन खरेदी करून महापालिका वन विभागाला देणार आहे. ही जागा मोजणीसाठी महापालिकेने पाच लाख ३४ हजार रूपये भरले आहेत. वनीकरणासाठी दिलेले पैसे आता परत घेतले जाणार असल्याचे महापालिकेने सांगितले.

# शहरात कोरोनाचा पहिला रुग्ण आढळला

## 42 वर्षांच्या पुरुषाला कोरोनाची लागण : मुंबईमध्ये आतापर्यंत 53 कोरोना रुग्ण

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई पाठोपाठ आता पिंपरी-चिंचवड शहरात कोरोना व्हायरसचा रुग्ण आढळून आला आहे. त्या रुग्णाला ताप आला म्हणून त्यांनी कोविड टेस्ट केल्यानंतर ती पॉझिटिव्ह आली आहे. ४२ वर्षांच्या पुरुषाला कोरोनाची लागण झाल्याचे समोर आलं आहे. राज्याची राजधानी मुंबईमध्ये आतापर्यंत ५३ कोरोना रुग्ण सापडले आहेत. त्यानंतर पुण्यासह पिंपरी-चिंचवडमध्ये मात्र कोरोनाचा एक रुग्ण सापडल्याने आता खबरदारीच्या उपाययोजना केल्या जात आहेत.



या वर्षातील पिंपरी-चिंचवडमध्ये आढळून आलेला हा पहिलाच कोरोना रुग्ण आहे. कोरोनाचा रुग्ण सापडल्यानंतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी आवश्यक ती काळजी घेण्याच्या सूचना करण्यात आल्या. राज्याच्या आरोग्य विभागाने खबरदारी म्हणून सार्वजनिक ठिकाणी मास्क घालायला सुरुवात करावी. त्याचप्रमाणे सामान्य लोकांनीही अनावश्यकपणे गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये. वेळोवेळी आपले हात धुवावेत आणि डोळ्यांना, नाकाला वारंवार हात लावणं टाळावं. असे आवाहन केले आहे.

दरम्यान, महानगरपालिकेच्या आरोग्य वैद्यकीय विभागाकडून शहरातील नागरिकांनी घाबरुन जावू नये. कोविड पॉझिटिव्ह आलेला रुग्णावर घरीच उपचार सुरु आहेत. त्याची तब्येत देखील ठीक आहे. मात्र, कोणी घाबरून जाऊ नये असेही आरोग्य विभागाचे डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितलं आहे.

# शहरातील 70 टक्के नाले, पावसाळी गटारे स्वच्छ

## महापालिकेचा दावा : रस्त्यावर साचलेल्या पाण्याला अचानक आलेल्या पावसाचे कारण

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात मंगळवारी झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे महापालिका प्रशासनाने केलेल्या पावसाळापूर्व कामांचा दर्जा उघड झाला असला, तरी शहरातील पावसाळी गटारे आणि नालेसफाईची कामे ६५ ते ७० टक्के पूर्ण झाल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. 'अचानक पडलेल्या पावसामुळेच रस्त्यांवर पाणी साचले.



महापालिकेच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी रस्त्यावर उतरून तक्रारींचे निवारण केले,' असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. म्हणाले.शहरात मंगळवारी झालेल्या पावसानंतर चेंबर, तसेच पावसाळी गटारे तुंबल्याने शहरातील अनेक भागांत रस्त्यांवर पाणी साचले होते. चेंबरच्या झाकणांवर अनेक ठिकाणी कचरा साठला होता. जागोजागी पाणी साचल्याने त्यामधून वाट काढताना नागरिकांना कसरत करावी लागत होती. महापालिकेने योग्य ती उपाययोजना न केल्याने झाडांच्या फांद्या पडणे, पावसाचे तसेच ड्रेनेजचे पाणी सोसायटीत शिरल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी बुधवारी पत्रकारांशी संवाद साधून महापालिकेची बाजू मांडली.

'शहरात पावसाळापूर्वीच्या कामासाठी नालेसफाई करण्यासाठी १४.५० कोटी रुपयांच्या, तर पावसाळी गटारांच्या स्वच्छतेसाठी १२ कोटी रुपयांच्या निविदांना मान्यता दिली आहे. एप्रिल महिन्यापासून ही कामे सुरू केली असून, ७ जूनपर्यंतची कामांना मुदत आहे. आतापर्यंत नालेसफाई, पावसाळी गटारे स्वच्छतेची कामे ६५ ते ७० टक्के पूर्ण झाली असून, पुढील काही दिवसांत ती पूर्ण होतील,' असे पृथ्वीराज यांनी सांगितले. हवामान खात्याने 'ऑरेंज अलर्ट' दिला होता. काही भागांत ६०, तर काही ठिकाणी १२० मिमी पाऊस पडला. त्यामुळे पाणी वाहून जाण्यास अडचणी आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'पावसाला सुरुवात झाल्यानंतर महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे तक्रारी येण्यास सुरुवात झाली. पाणी तुंबणे, पाणी शिरणे अशा ४६ तक्रारी महापालिकेकडे आल्या. तक्रारींची तातडीने दखल घेऊन घटनास्थळी कर्मचाऱ्यांना पाठविण्यात आले. नागरिकांच्या अडचणी दूर करण्यात आल्या. मध्यरात्री दीड वाजेपर्यंत महापालिका कर्मचारी, तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी रस्त्यावर उतरून काम करीत होते,' असे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज यांनी सांगितले.

### महापालिका कर्मचारी वाहतूककोंडीही सोडविणार

पावसाचे पाणी रस्त्यावर साचल्याने वाहनचालकांची तारांबळ उडते. वाहतूककोंडी निर्माण होते. केवळ पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी प्रयत्न करणे हे काम कर्मचाऱ्यांनी न करता रस्त्यावर झालेली वाहतूककोंडीदेखील सोडविण्याची जबाबदारी घ्यावी, अशा सूचना महापालिका कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. यापुढील काळात त्याची अंमलबजावणी होताना दिसेल. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्ष सुरू करण्यात आला असून, तीन जणांची टीम तयार करण्यात आली आहे. यामध्ये अभियंता, आरोग्य निरीक्षक, बिगारी यांचा समावेश असणार आहे, असेही पृथ्वीराज यांनी सांगितले.

### 'धोकादायक फलक काढून टाका'

**» शहरातील बेकायदा जाहिरातफलक, फ्लेक्स, बॅनर तातडीने काढून टाकण्याच्या सूचना महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी क्षेत्रीय कार्यालयाच्या सहायक आयुक्तांना केल्या. मंगळवारी झालेल्या वादळी पावसामुळे काही भागांत फ्लेक्स पडल्याचे प्रकार घडले होते. शहरातील जाहिरातफलक, फ्लेक्स यांचे संबंधित मालकांकडून स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे. बेकायदा फलक काढून टाका, असा आदेश त्यांनी दिला.**

# पुणे शहरात 24 तासांत 54 झाडे कोसळली

## सोसाट्याचा वारा, तसेच पावसामुळे वेगवेगळ्या भागांत झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात मंगळवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे ५४ ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. अग्निशमक दलाच्या जवानांनी तातडीने मदतकार्य करून रस्त्यात पडलेल्या फांद्या, झाडे हटवून रस्ते वाहतुकीस खुले करून दिले. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.



शहरात मंगळवारी दुपारी पाऊस सुरू झाला. रात्री आठनंतर पावसाचा जोर वाढला. सोसाट्याचा वारा, तसेच पावसामुळे वेगवेगळ्या भागांत झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. याबाबतची माहिती अग्निशमक दलाला मिळाल्यानंतर जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन तातडीने मदतकार्य सुरू केले. रस्त्यात पडलेल्या फांद्या, झाडे हटवून जवानांनी रस्ते वाहतुकीस खुले करून दिले. घोरपडी, धानोरी, कोरेगाव पार्क, येरवडा, एरंडवणे, हडपसर, बावधन, मुकुंदनगर, एरंडवणे, बिबवेवाडी, सिंहगड रस्ता, वारजे माळवाडी, शंकरशेठ रस्ता, नामदार गोपाळकृष्ण गोखले पथ (फर्ग्युसन रस्ता), कोथरूड, शिवाजीनगर, घोरपडी, विश्रांतवाडी भागात झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. बुधवारी सकाळी दहा वाजेपर्यंत शहरातील वेगवेगळ्या भागात ५४ ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणी गंभीर जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमक दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.

### सीमाभिंत कोसळल्याच्या घटना

**» धनकवडीतील तीन हत्ती चौकात सीमाभिंत कोसळण्याची घटना घडली, तसेच सिंहगड रस्त्यावरील हिंगणे खुर्द परिसरातील अक्षय कॉम्प्लेक्स इमारतीतील सीमाभिंत कोसळली. अग्निशमक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले, अशी माहिती दलाकडून देण्यात आली.**

### सोसायट्यांमध्ये पाणी

**» शहरात मंगळवारी झालेल्या पावसामुळे पुणे-सातारा रस्त्यावरील पंचमी हॉटेलजवळ असलेल्या एसटी कॉलनीत पाणी शिरले. तसेच वारजे परिसरातील चर्च, कोंढव्यातील एनआयबीएम रस्त्यावर असलेल्या अर्चना ग्रीन सोसायटीचे आवार, सहकारनगर भाग एक परिसरातील पॅसिफिक हाइट्स सोसायटीच्या आवारात पाणी साचले. विद्युत पंपाद्वारे पाणी उपसण्यात आले.**

# धनदांगड्यांना नाहीत पूररेषेचे नियम

## पिंपरी-चिंचवडमध्ये पवना, मुळा-मुठा, इंद्रायणीच्या पूररेषेत राजकीय नेत्यांच्या आशीर्वादाने उभारलेल्या अनधिकृत प्लॉटिंग, व्यावसायिक बांधकामांना महापालिकेचे अभय

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार चिखलीतील इंद्रायणी नदीच्या पूररेषेतील ३६ बंगले पिंपरी-चिंचवड महापालिकेने जमीनदोस्त केले. मात्र शहरात वाहणाऱ्या पवना, मुळा-मुठा आणि इंद्रायणी नद्यांच्या पूररेषेत राजकीय नेत्यांच्या आशीर्वादाने अनधिकृत प्लॉटिंग, व्यावसायिक बांधकामे केली आहे. त्यांना आठ महिन्यांपूर्वी नोटीस दिल्या. पण, सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून कारवाई केली जात नसल्याचे समोर आले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने केलेल्या सर्वेक्षणात तिन्ही नदी पात्रालगत आणि पूररेषेत धनदांडग्यांची निवासी, हॉटेल, फार्म हाऊस, फर्निचर दुकाने, नर्सरी, तसेच पत्राशेड, बांधकामे करून व्यावसायिकांना भाड्याने दिलेले आहेत. दरमहा त्यातून लाखो रुपयांचे भाडे वसूल करत आहेत. महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाने केलेल्या सर्वेक्षणात सुमारे तीन हजारांहून अधिक अनधिकृत बांधकामे, पत्राशेड आढळून आली आहे. दरवर्षी या अतिक्रमणांमुळे पुराचा फटका गोरगरीब नागरिकांना बसत आहे.

ही बांधकामे, पत्राशेड असणाऱ्या जागामालक, दुकानदारांना आठ महिन्यांपूर्वीच अतिक्रमण कारवाईची नोटीस देण्यात आल्या. मात्र, विधानसभा निवडणुकीमुळे सत्ताधारी आमदारांच्या आग्रहाखातर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी धनदांडग्यांच्या अतिक्रमणांवरील कारवाई टाळली होती. तसेच शहरातील पवना, इंद्रायणी नद्यांच्या पात्रालगत अनेक ठिकाणी भराव, राडारोडा टाकून बेकायदेशीर प्लॉटिंग झालेले आहे. पूररेषेतील ब्लू लाईनमध्ये जागेचे ले आउट करून प्लॉटिंगची जोरदार विक्री होत आहे. निवासी आणि व्यावसायिक बांधकामेदेखील नदीपात्रात वाढत आहेत. हे प्रकार सतत वाढू लागल्याने दरवर्षी पूरपरिस्थितीचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागण्यापूर्वी महापालिकेकडून नदीपात्रालगत आणि पूररेषेतील अतिक्रमणांवर कारवाईची तयारी केली होती. या कारवाईला पोलिसांचा बंदोबस्तदेखील मिळाला होता. मात्र, सत्ताधारी आमदारांच्या दबावामुळे आयुक्त शेखर सिंह यांनी अतिक्रमण कारवाईला स्थगिती दिली. तसेच नदीपात्रासह पूररेषेतील अतिक्रमण कारवाईला चालढकल करत विधानसभा निवडणुकीपूर्वीची वेळ मारून नेली.

पवना, इंद्रायणी, मुळा नद्यांच्या पात्रालगत काही ठिकाणी भराव, राडारोडा टाकून प्लॉटिंग झालेली जागा, पूररेषेतील ब्लू लाईनमध्ये जागेचे ले आऊट झालेली बांधकामे, हॉटेल, फर्निचर दुकाने, वर्कशॉप, गॅरेज, बेकरी, फार्म हाऊस, अशी व्यावसायिक बांधकामे नदीपात्रात उभी आहेत. या अतिक्रमण बांधकामांवर आयुक्त शेखर सिंह यांनी आठ महिन्यांपासून अभय दिले आहे. त्यांच्या अतिक्रमणावरदेखील कारवाई करून नद्यांना मोकळा श्वास घेऊ द्या, अशी मागणी पर्यावरणप्रेमीसह नागरिकांमधून होत आहे.



### दरवर्षी पुरामुळे हजारो नागरिकांचे स्थलांतर

» दरवर्षी अतिवृष्टी आणि धरणातून सोडणाऱ्या विसर्गामुळे शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी नद्यांना दरवर्षी पूर येतो. मात्र, नदीकाठच्या पूररेषेत पाटबंधारे आणि महापालिका अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण वाटाघाटींमुळे अनेक गृहप्रकल्प उभारले आहेत. नदीकाठावर राडारोडा टाकून बांधलेले व्यावसायिक पत्राशेड, हॉटेल, फर्निचर दुकाने, फार्म हाऊस, बेकायदेशीर बांधकामे उभारली आहेत. तसेच नद्यांमध्ये दररोज माती, दगड, बांधकामाचा राडारोडा, कचरा टाकला जात आहे. त्यामुळे पवना, इंद्रायणी, मुळा नद्यांचे पात्र दिवसेंदिवस अरुंद होऊन नदीकाठच्या शेकडो घरांत, सोसायटी, झोपडपट्टी भागात पाणी शिरत आहे. गतवर्षी पावसाळ्यात नदीचे पाणी शिरून सुमारे सात हजारांहून अधिक कुटुंबांना स्थलांतरित केले होते. यामुळे दरवर्षी नागरिकांचे अतोनात नुकसान होऊन त्यांना स्थलांतरित व्हावे लागते.

### पूररेषेत तीन हजारावर बेकायदेशीर बांधकामे

» शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नद्यांच्या पात्रालगत आणि निळ्या पूररेषेतील अनधिकृत बांधकामांचे महापालिकेने क्षेत्रीय कार्यालयनिहाय सर्वेक्षण केले आहे. त्यानुसार शहरात नद्याच्या पात्रालगत आणि पूररेषेत निवासी, व्यावसायिक बांधकामे अशी एकूण २ हजार ९१७ बांधकामे आढळून आली आहेत. यामध्ये निवासी १,५०८ आणि व्यावसायिक १,३८२ आणि इतर २७ अशी बांधकामे आहेत. हे सर्वेक्षण पूर्ण झाले नसल्याने ही आकडेवारी आणखी वाढणार आहे. या सर्व बांधकामांना आठ महिन्यांपूर्वीच नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

“ पवना, इंद्रायणी आणि मुळा-मुठा नदीच्या पूररेषेतील बिगर निवासी बांधकामांवर आणि पाण्याच्या प्रवाहाला अडथळा ठरणाऱ्या नैसर्गिक नाल्यावरील अतिक्रमण कारवाईला पुढील आठवड्यात सुरुवात करण्यात येईल. अन्य निवासी बांधकामांवर टप्प्याने कारवाई करण्यात येईल..

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका

# साडेचारशे पानी विकास आराखडा इंग्रजीमध्ये

## आराखडा इंग्रजी भाषेत असून मराठी भाषा सोयीस्करपणे टाळली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नवीन विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. हा आराखडा महापालिकेच्या संकेतस्थळावर असून त्यावर हरकती व सूचना घेण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. मात्र, आराखडा इंग्रजी भाषेत असून मराठी भाषा सोयीस्करपणे टाळली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच सुमारे ९० टक्के लोकांना इंग्रजी भाषा समजत नसल्याने त्यावर हरकती व सूचना येणार नाही.

त्यासाठीच प्रशासनाने तो इंग्रजी भाषेमध्ये प्रसिद्ध केला असल्याची टीका होत आहे. याबाबत वकीलीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. यावेळी अनीश काळभोर, धनराज काळभोर, अरमान पटेल आदी उपस्थित होते.

सामान्य मराठी भाषिक नागरिकांना इंग्रजी भाषेमुळे या मसुद्याचे पूर्ण व अचूक आकलन होत नाही. न समजणाऱ्या आराखड्याविषयी जनतेतून हरकती येणे अशक्य आहे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४, कलम ४(१) अन्वये राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी मराठी भाषेत सर्व अधिकृत व्यवहार, कागदपत्रे व अहवाल प्रकाशित करणे बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१, कलम ४(२) मध्ये सुधारणा करून, शासनाने सर्व महापालिका, नगरपरिषदांना मराठीतून प्रशासकीय कामकाज करण्याचे आदेश दिलेले आहेत, असे असतानाही महापालिकेच्या नगररचना विभागाने विकास आरखडा इंग्रजी भाषेमधून तयार केला आहे. हा आराखडा सर्वसाधारणपणे अभियंते, वास्तुविशारद, वकील किंवा या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींनाच ज्ञात होईल.

ज्या सर्वसामान्य जनतेच्या जागा आहेत, त्यांना आराखडा समजणे शक्य नाही. विकास आराखडा शहराच्या वर्तमान व भविष्यावर परिणाम करत असतो. त्यासाठी त्यामध्ये नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे. मात्र, सर्रास इंग्रजी भाषेच्या वापर केल्याने नागरिकांना हा नकाशा समजणार नाही. त्यामुळे पुढील काळात अनेक गैरसमज, तक्रारी व गैरप्रकार उद्भवू शकतात. त्याला कारणीभूत केवळ हा इंग्रजीतील नकाशा ठरू शकतो. त्यामुळे हा नकाशा व आराखडा मराठी भाषेत देखील प्रसिद्ध कऱण्याची मागणी होत आहे.




“ विकास आराखड्याचा संपूर्ण मजकूर व नकाशा अति-शुद्ध, प्रशासकीय स्तरावर अचूक अशा मराठीत भाषांतरित करून तो महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावा. तसेच छपाई स्वरूपात जनतेस उपलब्ध करून द्यावा. सर्व जनतेपर्यंत हा आराखडा पोहोचला जाईल याची प्रशासनाने सोय करावी. जर नकाशा नागरिकांपर्यंत पोहचला तरच त्यावर हरकती व सूचना येतील. इंग्रजी भाषेत आराखडा प्रसिद्ध करून महापालिकेने शासन आदेश डावलला आहे. तसेच मराठी भाषेचा अपमान केला आहे.

- अनीश काळभोर, विधी विद्यार्थी

# शासनाकडून शेतकऱ्यांच्या कोर्टात चेंडू

## जमिनीच्या सातबारा उतारावर विमानतळ प्रकल्पासाठी आरक्षित असे शेरे मारल्यानंतर शासनाने हरकती देण्यासाठी 15 दिवसांची मुदत दिली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळ प्रकल्पाचा मुद्दा आता चांगलाच ऐरणीवर आला आहे. एकीकडे शेतकऱ्यांचा कडाडून विरोध असतानाच दुसरीकडे शासनाने प्रकल्पासाठी युद्ध पातळीवर तयारी सुरु केली आहे. जमिनीच्या सातबारा उतारावर विमानतळ प्रकल्पासाठी आरक्षित असे शेरे मारल्यानंतर शासनाने हरकती देण्यासाठी 15 दिवसांची मुदत दिली आहे. तसेच या कालावधीत हरकती प्राप्त न झाल्यास कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे विविध माध्यमातून प्रकल्पास विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कोर्टातच शासनाने चेंडू टाकला आहे. त्यामुळे आता किमान हरकती घेण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. त्यामुळे शेतकरी हरकती नोंदविणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### हरकत देण्यापूर्वी मिळकतीच्या नोंदी आवश्यक

» शासनाने सातबारा उतारावर शेर मारल्यावर हरकती देण्यास सांगितले आहे. तसेच हरकत देण्यापूर्वी त्यामध्ये आपल्या मिळकतीचे वर्णन करणे आवश्यक आहे. मात्र हजारो शेतकऱ्यांच्या मिळकत नोंदी झालेल्याच नाहीत. यापूर्वी शेतकरी गावठाण मध्ये राहत असल्याने गावठाण मधील नोंदी झाल्या. मात्र नंतरच्या काळात अनेक शेतकरी शेतात राहण्यास गेले. तिथेच पक्की घरे, जनावरांचे गोठे, शीतगृह, पोल्ट्री शेड उभारले, शेततळे, बोअर, विहीर घेतली मात्र स्वतःच्या शेतात असल्याने नोंद करण्याची फारसी कोणाला गरज वाटली नाही आणि कोणाच्या तक्रारीही नव्हत्या. त्यामुळे आजपर्यंत तशा नोंदी झाल्या नाहीत. मात्र आता नोंदी आवश्यक झाल्या असल्याने अनेक शेतकऱ्यांकडून मिळकत नोंदी करण्याची मागणी केली जात आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी पारगाव अशा सात गावात सरकारचा विमानतळ प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न आहे. मात्र या सातही गावातील शेतकऱ्यांचा प्रकल्पाला कडाडून विरोध आहे. असे असताना शासनाकडून दररोज वेगवेगळे आदेश पारित करण्यात येत आहेत. मागील महिन्यात ड्रोन सर्व्हेला विरोध करूनही शासनाने शेतकऱ्यांचा कोणताही विचार केलेला नाही. एकीकडे शेतकऱ्यांचा कडवा विरोध असतानाही शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर पुरंदरमधील प्रस्तावित विमानतळ प्रकल्पासाठी आरक्षित असे शेरे मारले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत अधिकच भर पडली आहे.

> साध्या कादावर शेतकऱ्याने स्वतःचे नाव, गाव, मिळकत क्रमांक, तसेच ग्रामपंचायत दप्तरी नोंदी झाली नसल्यास संबंधित मिळकतीचे वर्णन लिहून द्यावे. त्यासाठी वेगळे ॲफिडेविट करण्याची फारसी गरज नाही. साध्या पद्धतीने अर्ज तयार करून तो जमा करावा तसेच त्याची एक प्रत स्वतःकडे ठेवावी. शेतकऱ्यांना जसे शक्य आहे त्या पद्धतीने हरकती स्वीकारण्यात येतील तसेच काही अडचण असल्यास प्रांत कार्यालय येथे संपर्क साधावा.
>
> **- वर्षा लांडगे, प्रांताधिकारी, पुरंदर**

दरम्यान, शासनाने जमिनीवर शेरे मारल्यानंतर त्यावर हरकती घेण्यासाठी 15 दिवसांची मुदत दिली आहे. मात्र नोंदी केल्यावर हरकती घेण्यासाठी मुदत सुरू होवून आठ दिवसापेक्षा जास्त कालावधी झाला, मात्र अद्यापपर्यंत शेतकऱ्यांनी हरकती नोंदविण्यास फारसा प्रतिसाद दिलेला नाही. प्रकल्पात येणाऱ्या सातही गावांना नोटीस प्राप्त झाल्या असून आता शेतकऱ्यांकडून जमीन देणे आहे किंवा विमानतळ प्रकल्पास जमीन द्यायची नाही अशा पद्धतीने हरकती जमा करायच्या आहेत. सध्या प्रकल्पाचा शेतकऱ्यांचा विरोध पाहता जमीन न देण्याबाबत हरकती मिळणे प्रतीक्षेत आहे. मात्र अद्यापपर्यंत कोणत्याही हरकती प्राप्त न झाल्याने भविष्यात शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरू शकते.

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळ प्रकल्पाचा मुद्दा आता चांगलाच ऐरणीवर आला आहे. एकीकडे शेतकऱ्यांचा कडाडून विरोध असतानाच दुसरीकडे शासनाने प्रकल्पासाठी युद्ध पातळीवर तयारी सुरु केली आहे. जमिनीच्या सातबारा उतारावर विमानतळ प्रकल्पासाठी आरक्षित असे शेरे मारल्यानंतर शासनाने हरकती देण्यासाठी 15 दिवसांची मुदत दिली आहे.

# मांजरी बुद्रुक येथील साचलेल्या पाण्याविरोधात अनोखे आंदोलन; गजेंद्र मोरे यांनी पाण्यात सोडली होडी

## समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते गजेंद्र बाबा मोरे यांनी साचलेल्या पाण्यात होडी सोडून अनोखे आंदोलन केले.

**पुणे | प्रतिनिधी**

मांजरी बुद्रुक येथील मुळा-मुठा नदीवरील पुलाच्या सखल भागात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहत आहे. या पाण्यातून वाट काढणे पादचारी आणि दुचाकीस्वारांसाठी जिकिरीचे ठरत आहे. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते गजेंद्र बाबा मोरे यांनी साचलेल्या पाण्यात होडी सोडून अनोखे आंदोलन केले.

मांजरी बुद्रुक येथील मुळा-मुठा नदीवरील पूल सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधला आहे, तर पुलाच्या पुढील भागात पीएमआरडीएने रस्त्याचे काम केले आहे. मांजरी बुद्रुक ग्रामपंचायत आता पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्याने या भागात महानगरपालिकेचा कारभार सुरू आहे. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभाग, पीएमआरडीए आणि पुणे महानगरपालिका या तीनही विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने रस्ता आणि पूल यांची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. परिणामी, प्रत्येक पावसाळ्यात या भागात पाणी साठून नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. पादचाऱ्यांना पाण्यातून वाट काढणे कठीण झाले असून, दुचाकी चालवणेही धोक्याचे ठरत आहे.





### तीन विभागांमधील समन्वयाचा अभाव; नागरिक त्रस्त

» मांजरी बुद्रुक रेल्वे गेट ते मुळा-मुठा नदी स्मशानभूमीपर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण आणि सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम पीएमआरडीएने हाती घेतले आहे. मात्र, अनेक वर्षे उलटूनही हे काम पूर्ण झालेले नाही. याशिवाय, पुलाचे काही कामही प्रलंबित आहे. अवघ्या दोन ते अडीच किलोमीटरच्या या रस्त्यावर तीन विभाग एकाच वेळी काम करत असले, तरी समन्वयाअभावी कामे रखडली आहेत. यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

मांजरी बुद्रुक रेल्वे गेट ते मुळा-मुठा नदी स्मशानभूमीपर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण आणि सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम पीएमआरडीएने हाती घेतले आहे. मात्र, अनेक वर्षे उलटूनही हे काम पूर्ण झालेले नाही. याशिवाय, पुलाचे काही कामही प्रलंबित आहे. अवघ्या दोन ते अडीच किलोमीटरच्या या रस्त्यावर तीन विभाग एकाच वेळी काम करत असले, तरी समन्वयाअभावी कामे रखडली आहेत.

गजेंद्र बाबा मोरे यांनी या आंदोलनाद्वारे प्रशासनाचा निषेध नोंदवताना सांगितले, "या भागातील नागरिकांचे हाल होत आहेत. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी आणि रस्त्याचे काम पूर्ण करावे." त्यांच्या या अनोख्या आंदोलनाने परिसरात चर्चा निर्माण झाली असून, प्रशासन या समस्येचे निराकरण करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.